# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १९/२०२२

तक्रारकर्ता, श्री.दिलिप रामचंद्र कदम
मु.पो.कोयनावेळे (घोटकॅम्प)
ता.पनवेल, जि.रायगड

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
मा.ग्रा.रो.ह.यो.
अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय पनवेल
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र
ता.पनवेल, जि.रायगड

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मा.ग्रा.रो.ह.यो.
अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय पनवेल
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र
ता.पनवेल, जि.रायगड

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १३/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३१/८/२०२१ | ---- | ५/१०/२०२१ | ६/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.३०/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती देण्यात आलेली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल कार्यालय पनवेल उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"अ) कायेना पुर्नवसाहत अधिकारी यांचेकडील दि.२४/५/१९६६ चे वाटप पत्र तसेच*
*ब) मामलेदार पनवेल ता पनवेल यांचा हुकुमनामा क्रमांक RTS/WME/०५/० DATED २८.०५.१९६६ अन्वये मौजे कोयनावेळे पेंधर येथील जमिनीचे वाटप करण्यात आलेल्या बाबतची आदेशाची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "मागणी केलेली माहिती वेळेत प्राप्त न झाल्यामुळे" असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.६/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी यांनी सहा. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, अभिलेख कक्ष यांचेमार्फत अभिलेख कक्षात शोध घेऊन सदरची माहिती तातडीने सदरच्या आदेशाच्या दिनांकापासून ०७ कार्यालयीन दिवसांमध्ये निशुल्क पुरविण्यात यावी. जी माहिती तलाठी कार्यालयाकडे असेल ती अपीलार्थी यांना पुरविण्याबाबत संबंधित तलाठी यांना कळविण्यात येवून तसे अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.*"असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल यांना याप्रकरणाची काहीच माहिती नाही. सबब त्यांना प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा पुढील सुनावणीस सादर करणेबाबत कळविणे उचित होईल. तसेच तक्रारकर्तास माहिती न देणेबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कोणतेच कारण सांगता न आल्यामुळे, याबाबत तहसिलदार पनवेल यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर खुलासा सादर करणेबाबत कळविणे उचित होईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल यांना याप्रकरणाची काहीच माहिती नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रतिदिन रु.२५०/-

(अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तक्रारकर्तास माहिती न देणेबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कोणतेच कारण सांगता न आल्यामुळे, याबाबत **तहसिलदार पनवेल** यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर खुलासा सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५/६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार पनवेल,
तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र,
ता.पनवेल जि.रायगड

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील,
महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र,
ता.पनवेल जि.रायगड

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी व तहसिलदार पनवेल यांना आदेशित करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि.२५/६/२०२५ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल **तसेच** तहसिलदार पनवेल अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

आयोगाने दि.१३/५/२०२५ च्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक पाटील यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. तथापि सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही ते अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी याबाबत आयोगास लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल यांना आयोगाने दि.१३/५/२०२५ च्या आदेशान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही ते अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी याबाबत आयोगास लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही. त्यांनी माहिती अधिकारांतर्गत करावयाच्या कार्यवाहीस महत्त्व दिल्याचे दिसून येत नाही. त्यांना दि.१३/५/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून १ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **तहसिलदार पनवेल** यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

२) तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती का देण्यात आली नाही, याचा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक पाटील आयोगास मागील सुनावणीस करू न शकल्याने याबाबत **तहसिलदार पनवेल** यांना आजच्या

सुनावणीस उपस्थित राहून खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. तथापि आजच्या सुनावणी सूचना प्राप्त होऊनसुध्दा ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यासाठी त्यांनी आयोगाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही. सबब पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी **तहसिलदार पनवेल** यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८ (३) (क) अन्वये आयोग कार्यालयाने पनवेल शहर पोलीस ठाणे यांचेमार्फत समन्सची बजावणी करावी.

३) प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.६/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) तहसिलदार पनवेल,
तहसिलदार कार्यालय पनवेल, साईनगर रोड,
तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड

४) आस्थापना अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी,
तहसिलदार कार्यालय पनवेल, साईनगर रोड,
तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड

५) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील,
महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड